प्रेसनोट                                                                 दिनांक ०४/०५/२०२३

**उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई येथील खासगी एजंट यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | :- | ए.पी.एम.सी. पो.स्टे. नवी मुंबई ठाणे दैनंदिनी नोंद क. ३७/२०२३<br>दि. ०४/०५/२०२३, वेळ २०:३२ वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | १) सुहास लहू जाधव, वय- ३४ वर्षे, धंदा- खासगी एजंट, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई<br>२) शरद वसंत कांबळे, वय- ४५ वर्षे, धंदा खासगी एजंट, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू.२,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू.१,०००/-स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू. १,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | तकारदार यांचे प्रवासी ॲटो रिक्षावर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी येथील पथकाकडून आकारलेल्या दंडाची रक्कम भरणा केलेनंतर ऑनलाईन दंड भरणा केलेली पावती व तक्रारदार यांचे लायसन्स सोडवून देण्याकरीता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी येथील खिडकी नं. २८ मधील २ कर्मचारी हे शासकीय दंडाव्यतिरीक्त रू. २,०००/- रोख रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दि ०४/०५/२०२३ रोजी ॲसीबी, नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली.<br>प्रस्तुत तकारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०५/२०२३ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी या शासकीय कार्यालयाचे खिडकी नं. २८ मधील दोन कर्मचाऱ्यांनी तक्रारदार यांचे दंड भरलेबाबतची पावती व लायसन्स सोडवून देण्याकरीता शासकीय दंडाव्यतिरीक्त रू. २,०००/-लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू.१,०००/- स्विकारण्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि. ०४/०५/२०२३ रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान सुहास लहू जाधव यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू.१,०००/-स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह १८:१७ वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच शरद वसंत कांबळे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानंतर ताब्यात घेण्यात आलेले दोन कर्मचारी हे खाजगी एजंट असल्याचे समजले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी :-मा.श्री.सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेत स्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :-spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :-१०६४
दुरध्वनी क. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
व्हॉटस्ॲप क. :-९९३०९९७७००

( विद्युलता चव्हाण )
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई